डॉ. मोहन ना. आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
Email Id:sports.mudept@gmail.com
Website: www.mu.ac.in

मुंबई विद्यापीठ

विद्यापीठ क्रीडा संकुल, मरिन लाईन्स,
मुंबई – ४०० ०२०.
फोन क्र. ०२२ – २२८२ ६०२७ /
२२८१ ७६९८

## विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

परिपत्रक क्र.क्रीडा/ 76 /२०23 — दि. 01/01/२०24

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
मुंबई विद्यापीठातील सर्व संलग्न महाविद्यालये व
मान्यताप्राप्त संस्था.

**विषय:– मुंबई विद्यापीठांतर्गत संलग्नित असलेल्या सर्व मुंबई उपनगर मधील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज पारंपारिक क्रीडा महकुंभ च्या स्पर्धामध्ये सहभागी होणेबाबत.**
**संदर्भ:– मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता (महाराष्ट्र शासन) यांचे कार्यालयीन पत्र क्र. जा.क्र.मंत्री/कौ.,उद्यो.,नावि.,/टिप्पणी/०८/२०२३ ; दि. ०६/१२/२०२३ च्या अन्वये**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला यावर्षी ३५० वर्षे पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन व क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने पारंपारिक खेळांना वाव मिळावा आणि प्रसार व्हावा याकरीता मुंबई उपनगर जिल्ह्यात श्री. शिवछत्रपती शिवाजी महाराज पारंपारिक क्रीडा महकुंभ याचे आयोजन दिनांक १२ जानेवारी, २०२४ ते २७ जानेवारी, २०२४ या कालावधीत करण्यात येणार आहे.

पारंपारिक खेळांना वाव मिळावा आणि प्रसार व्हावा यासाठी मुंबई उपनगरातील सर्व महाविद्यालयामधील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सदर स्पर्धेत सहभागी करावेत. तसेच यास्पर्धेत आपल्या महाविद्यालयाकडून एकुण किती स्पर्धकांनी सहभाग (विविध खेळानुसार) नोंदविल्याचा अहवाल, सदरची स्पर्धा संपल्यानंतर मा. संचालक, क्रीडा व शा. शिक्षण, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे उपरोक्त पत्त्यावर देण्यात यावा, जेणेकरुन सदरची माहिती मा. कुलगुरु, मुंबई विद्यापीठ यांना देण्यात येईल.

धन्यवाद!

UNIVERSITY OF MUMBAI SPORTS & PHY. EDUN.

(डॉ. मोहन ना. आमृळे)
संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण